झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां२/२६९१/२०२५
दिनांक : ०२ /०९/२०२५.

### झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता )
### (विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये)

<u>प्रस्तावना :</u>

मौजे एरंडवणा, सि.स.नं. २५४ (पै), प्लॉट नं.१४, (स.नं. ४१/५अ/५ब) येथील झोपडपट्टी संदर्भात ७६४.५० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. नमन इन्फ्रा यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.११/०६/२०२५ रोजी सदर मिळकतीवरील प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत प्रस्तावाची छाननी करून झोपडीधारकांच्या ५१% हून जास्त संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत दाखल प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फ़त दि.११/०७/२०२५ रोजी मंजूर नियमावली २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "<u>झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना</u>" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/ सूचना अथवा तक्रार प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

१) दि.०९/०७/२०२५ रोजी निर्गमित केलेल्या प्रारूप योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव करून सदर प्रारूप योजना अंतिम करण्यात येत असून सदर योजनेस प्रारूप योजनेतील सर्व शर्ती-अटीसह प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेत आवश्यकतेप्रमाणे होणारे बदल झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस /प्रतिनिधींना वेळोवेळी अवगत करणे विकसकावर बंधनकारक राहील.

२) सदर योजनेद्वारे विकसक मे. नमन इन्फ्रा यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, विकसकांनी झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व नियमावली २०२२ मधील तरतूदीस अधिन राहून योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी विकसकाची राहील.

३) सदर योजनेचे विकसक मे. नमन इन्फ्रा यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे तसेच अन्य सर्व संविधानिक प्राधिकरणे व झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम लागू राहतील.अशा सर्व प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशांचे/आदेशाचे अनुपालन करणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) झोपडपट्टी अधिनियमातील कलम ३ (ड) अन्वये झोपडपट्टी निर्मुलनाचे आदेश पारीत झाल्यानंतर, योजनेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या बांधकाम प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र

प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

५) परिपत्रक क्र.०६/२०२४ दि.०२/०९/२०२४ नुसार ३२ पुनर्वसन सदनिकांची योजनेस बांधकाम परवानगी प्राप्त झाले पासून ३६ महिन्यात पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील.

६) सदर योजना क्षेत्रात निर्मुलन आदेश पारित झाल्यानंतर विकसकास झोपडीधारकांना दरमहा भाडे दि.१२/१२/२०२३रोजीच्या परिपत्रकानुसार देणे बंधनकारक असेल.

७) सदर योजनेत सद्यस्थितीत कलम ३(क) नुसार घोषित केलेल्या क्षेत्रांतर्गत संरक्षित असलेली सर्व सार्वजनिक (धार्मिक स्थळे) यांचे पुनर्वसन प्रचलित शासन निर्देशानुसार पुनर्वसन योजनेत प्रयोजन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील. बांधकाम परवानगीपूर्वी सदर बाबींची पडताळणी करणे आवश्यक राहील.

८) सदर प्रकरणी ७६४.५० चौ.मी. क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून निर्धारित आहे. मात्र ५५०.५९ चौ. मी. क्षेत्राव्यतिरिक्त उर्वरित २१३.९० चौ. मी. क्षेत्राचे विकसनाचे हक्क जमीनमालक विद्या राजेंद्र नागरे यांनी विकसक मे. नमन इन्फ्रा यांना तबदील केलेले नाहीत, याबाबत जमीनमालक विद्या राजेंद्र नागरे व विकसक मे. नमन इन्फ्रा यांच्या स्वाक्षरीने दि. १४/०८/२०२५ रोजी हमीपत्र या कार्यालयास सादर केले आहे, त्यानुसार उर्वरित २१३.९० चौ. मी. क्षेत्राचा विकसन करारनामा विकसक यांचे लाभात बांधकाम परवानगी पूर्वी या कार्यालयाकडे सादर करणे विकसकावर बंधनकारक राहील.

प्रस्तुत निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे झाल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे दाखल करता येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रशासकीय मान्यता ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- /०८/२०२५

२१

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

O/C
Sadhane

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.

२.मे. नमन इन्फ्रा
पत्ता- १०९९, स्नेह गार्डन, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर, पुणे- ४११०१६

३.मौजे एरंडवणा, सि.स.नं. २५४ (पै), प्लॉट नं.१४, (स.नं. ४१/५अ/५ब) झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.